186

Issue : XVI, Vol. X
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS IMPACT FACTOR 6.10 ISSN 2229-4406
URA Mar. 2018 To Aug. 2018

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Synthesis, Characterization and Microbial Study of Cu(II), Ni(II), Co(II) Aldimine Metal Complexes **Dinkar P. Kotwal** | 1 |
| 2 | Infrastructure and Economic Development in India **Sambhaji N. Ingale** | 7 |
| 3 | Terrorism and Olympic Games **Dr. Bhaskar Mane** | 12 |
| 4 | Effects of Asanas and Pranayama Practices on Flexibility of Jr. Badminton Players **Dr. Manoj Reddy, Dr. N. Bhaskar Reddy** | 18 |
| 5 | मैत्रेय पुष्पा के कथा साहित्य में लोकतत्त्व **डॉ. व्यंकट पाटील** | 23 |
| 6 | हिंदी कथा साहित्य में बदीउज्जमाँ का स्थान **डॉ. एम. डी. इंगोले** | 27 |
| 7 | शेतकऱ्यांच्या समस्याबाबत महात्मा फुले यांचे विचार **डॉ. शिवराज पाटील** | 32 |
| 8 | पीकाचे नियोजन व पाण्याचे व्यवस्थापन एक काळाची गरज **डॉ. एच. एन. रेडे** | 38 |
| 9 | रा. रं. बोराडे यांच्या कथा साहित्यातील वाक्प्रचार **डॉ. त्र्यंबक कृ. धरणे** | 41 |
| 10 | ग्रामीण कादंबरीतून येणारे वारकरी संप्रदायाचे वर्णन **डॉ. शिवानंद मच्छिंद्र गिरी** | 48 |
| 11 | प्रशासनातील नैतिकता **डॉ. पी. व्ही. भुताळे** | 51 |
| 12 | कांशीराम यांचे धर्माविषयीचे विचार **भगवान वीर** | 54 |


Co-ordinator
IQAC
Mahavidyalaya

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

Issue : XVI, Vol . X
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.10
ISSN 2229-4406
Mar. 2018 To Aug. 2018 

11

# प्रशासनातील नैतिकता

डॉ. पी. व्ही. भुताळे
लोकप्रशासन विभाग,
श्री. गुरुबुध्दीस्वामी महाविद्यालय,
पूर्णा, जि. परभणी

Research Paper - Public Administration

## आदर्श प्रशासनाकरीता नीतिमूल्यांची आवश्यकता

प्रशासन हे संपूर्ण समाजाच्या परिवर्तनाचे साधन आहे. आधुनिक काळात संपूर्ण समाज जीवनाच्या सर्वांगिण विकासाची जवाबदारी प्रशासनावर असल्यामुळे आदर्श प्रशासनासाठी नीतिमूल्यांची नितांत गरज आहे. अलीकडील काळात नीतिमुल्यांची अवहेलना होत आहे. विचार-आचार व व्यवहार या तीन सुत्रांच्या समन्वयाने व्यक्ति कार्यात सफल होतो. प्रशासनातील नैतिक मुल्यांचा ऱ्हास होण्याची कारणे म्हणजेच काम, क्रोध, मोह, लोभ व अहंकार हे आहेत. व्यक्ति प्रचंड प्रमाणात स्वार्थी बनत गेली आहे. म्हणून प्रशासनात नीतिमूल्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रशासनात नैतिकता निर्माण झाल्यावरच सर्व समाजाला न्याय मिळू शकते.

## आदर्श प्रशासना करीता नैतिक गुणांची गरज

प्रशासन कुशलतापूर्वक चालविणे एक महत्त्वपूर्ण बाब आहे. प्रशासनापुढे अनेक समस्या असतात त्या सर्व अडचणीतून मार्ग काढून प्रभावी संचालन करावे लागते. यासाठी प्रशासकाच्या अंगी काही महत्त्वपूर्ण गुण असणे महत्त्वाचे आहे.

## प्रशासनाचे गुण

१. योग्यता :- प्रशासन कोणतेही असो मग ते खाजगी असो किंवा सरकारी प्रशासनाचे कार्य उत्तम पध्दतीने होण्यासाठी प्रशासकांमध्ये तेवढीच मोठी योग्यता किंवा पात्रता असणे गरजेचे आहे.

२. अनुशासन :- आदर्श व उत्तम प्रशासकाच्या अंगी सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे अनुशासन असणे गरजेचे आहे.

३. आत्मनियंत्रण :- प्रशासनाचे संचालन प्रभावी होण्यासाठी प्रशासकाकडे आत्मनियंत्रण अत्यंत महत्त्वाचे आहे.

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

Scanned by CamScanner

Issue : XVI, Vol . X
URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS IMPACT FACTOR 6.10 ISSN 2229-4406
Mar. 2018 To Aug. 2018 52

४. देशाप्रती निष्ठाभाव, प्रामाणिकपणा :- कोणत्याही देशातील प्रशासक हा देशाप्रति एकनिष्ठ व प्रामाणिक असावा लागतो. त्याशिवाय देशाचा विकास होवू शकत नाही.

५. सद्व्यवहार :- प्रशासक हा सदाचारी व सद्व्यवहारी असला पाहिजे. चांगले व्यवहार म्हणजेच वर्तणूक चांगली असली पाहिजे. नि:पक्ष पध्दतीने व्यवहार केला पाहिजे.

६. आत्मनिर्भरता :- चांगल्या प्रशासकाला इतरावर अवलंबून राहाता कामा नये तर तो आत्मनिर्भर असावा.

७. कार्य व्यवहार विधिवत व स्वच्छ असणे :- प्रशासनाचे सर्व प्रशासकीय व्यवहार कायदा व नियमांच्या आधारेच करावे. संपूर्ण व्यवहार पारदर्शी व स्वच्छ असणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रशासनाकडून जनतेला न्याय मिळू शकतो.

८. समर्पणाची भावना असणे :- कोणत्याही प्रशासनात प्रशासक कर्मचारी हे समर्पण भावनेने कार्ये व भूमिका पार पाडली पाहिजे तरच चांगले प्रशासन करता येते.

९. उत्तरदायित्व स्विकारणे :- कोणत्याही संघटनेच्या प्रमूख प्रशासकाला कार्ये, अधिकार याबरोबरच उत्तरदायित्व स्विकारावे लागते.

१०. प्रत्येक कार्य स्फूर्तीने व जागरूकतेने करणे :- प्रशासकाकडे कार्ये करण्याची प्रेरणा असली पाहिजे. तसेच प्रत्येक निर्णय वा कृती करताना प्रशासक अत्यंत जागरुक राहिला पाहिजे.

११. सहिष्णुता आणि धर्माचे गुण असणे :- आपल्या देशाची संस्कृती ही सहिष्णु आहे. तसेच कर्म धर्माला आपण अधिक महत्त्व देतो. म्हणून प्रशासनातील प्रशासक सहिष्णू व राजधर्माचे पालन करणारे असावे. म्हणजेच शांततापूर्वक व चांगले तेवढेच निर्णय व कार्ये करावे.

१२. नेहमी आशावादी असणे :- प्रमूख प्रशासकाकडे संपूर्ण संघटनेची जबाबदारी असल्यामुळे नेहमीच तो यशस्वी होतोच असे नाही तेंव्हा चांगले कार्ये करुन प्रशासन यशस्वी होण्यासाठी आशावादी असणे गरजेचे आहे.

१३. नेहमी विश्वास संपादन करणारा असावा :- कोणत्याही प्रशासनात प्रशासकाला संघटित विश्वास संपादन करणे अत्यंत महत्त्वाचे असते. स्वत:च्या विश्वासाबरोबर सहकारी कर्मचाऱ्यात विश्वास निर्माण करावा.

वरिल गुणधारक आदर्श प्रशासक हा यशस्वी प्रशासक होवू शकतो. केवळ त्याच्याच नैतिकतेमुळे प्रशासनाचे कार्य संचालन चांगले होवू शकते.

**प्रशासनातील पाच सुत्रे**

१. सल्ला घेणे :- यशस्वी प्रशासकांनी वरिष्ठाकडून व योग्य व्यक्तिकडून सतत सल्ला घ्यावा. सल्ला घेणे कमीपणा नसतो तर ते मार्गदर्शन असते.

२. बुध्दी स्थिर ठेवणे :- प्रमुख प्रशासकांनी कार्य करताना नेहमी बुध्दीस्थिर व शांत ठेवावी.

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha, Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya, Estd. 1983
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Scanned by CamScanner

Issue : XVI, Vol . X
URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.10
ISSN 2229-4406
Mar. 2018 To Aug. 2018 

३. सदाचार :- उत्तम प्रशासकाचे आचारण सदाचारीच असले पाहिजेत.

४. संयम :- अर्थातच प्रशासकाकडे सहनशिलता असणे गरजेचे आहे.

५. सातत्य :- आदर्श प्रशासकाकडून नेहमीच सातत्याने कार्ये केली जातात. एका कार्याचा शेवट म्हणजे दुसऱ्या कार्याचा आरंभ म्हणजे सातत्य होय.

## सारांश

आदर्श प्रशासनाकरीता आधूनिक काळात नीतिमुल्यांना महत्त्व आले आहे. प्रशासकाचा नैतिक गुणाच्या बळावरच तो यशस्वी व प्रभावी प्रशासक होवू शकतो. ज्यातून आदर्श प्रशासनाची निर्मीती होते.

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani